# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807

ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230


जा.क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 27 /2026-27 चिखलदरा 444 807, दिनांक:- 04/05/26

प्रति,

**मा. उप वनसंरक्षक,**
**( शिक्षण व प्रशिक्षण )**
**म.रा.पुणे.**

**विषय**:- माहे मार्च 2026 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.
**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक 01/03/2026 ते 31/03/2026 पर्यंतचा मासिक शैक्षणिक अहवाल सोबत सहपत्रित करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 01 ते 28 )

**( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )**
**संचालक,**
**वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.**

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

**( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )**
**संचालक,**
**वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.**

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नवनियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 01/10/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा नवनियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र.** 63 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे.

**दिनांक** 01/03/2026 **ते** 31/03/2026 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/03/2026 ते 31/03/2026** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *



| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना आगार व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण. ( दि. 05/03/2026 ) व दि.13/03/2026 रोजी परतवाडा येथे व दि. 14/03/2026 रोजी कुप कामे पाहणी करीता (जारीदा) येथे क्षेत्रीय दौरा. | 03 ते 07 |
| 02 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची कोकण दौरा परीक्षा (दि. 05/03/2026) | 08 |
| 03 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना RRT/RRU या विषयावर प्रशिक्षण. ( दि. 06/03/2026 ) | 09 |
| 04 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना आस्थापना या विषयावर प्रशिक्षण. ( दि. 07/03/2026 ) | 10 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची PPT सादरीकरण ( दि. 09/03/2026 ) | 11 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची मौखिक परीक्षा ( दि. 10/03/2026 ) | 12 ते 13 |
| 07 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना सायबर सेल या विषयावर प्रशिक्षण. ( दि. 12/03/2026 ) | 14 |
| 08 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना आपत्ती व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण. ( दि. 09/03/2026 ) | 15 |
| 09 | यशवंतराव चव्हाण यांची जयंती. (दि. 12/03/2026) | 16 |
| 10 | शहीद दिन (दि. 23/03/2026) | 17 |
| 11 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची 05 कि.मी. धावण्याची स्पर्धा. (दि. 21/03/2026 ) | 18 |
| 12 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना कराटे प्रशिक्षण. | 19 |
| 13 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची क्रीडा स्पर्धा. | 20 |
| 14 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा सांस्कृतीक कार्यक्रम. (दि.20/03/2026 ) | 21 |
| 15 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम. (दि. 28/03/2026 ) | 22 ते 27 |
| 16 | वृत्तपत्र कात्रणे. | 28 |

**01. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना आगार व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण ( दि. 05/03/2026 ).**

## व दि.13/03/2026 रोजी परतवाडा येथे व दि. 14/03/2026 रोजी कुप कामे पाहणी करीता (जारीदा) येथे क्षेत्रीय दौरा.



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींना **श्री. एस.एस. बिजागरे, लेखापाल (से.नि.)** यांनी **आगार व्यवस्थापन** या विषयावर प्रशिक्षण दिले. तसेच **दि.** 13/03/2026 रोजी **आगार व्यवस्थापन** व **कुप कामांची** माहिती करीता परतवाडा येथे व **दि.** 14/03/2026 रोजी **कुप कामे** पाहणी करीता (**जारीदा** ) येथे क्षेत्रीय दोरा नेन्यात आला.

**या प्रशिक्षणात खालील महत्वाच्या बाबींचा समावेश होता:**

**आगार व्यवस्थापनाची संकल्पना**: वन विभागातील आगार म्हणजे साठवण, साधनसामग्री आणि संसाधनांचे योग्य नियोजन व देखरेख कशी करावी याबाबत माहिती देण्यात आली.

**साठा नियंत्रण**: उपलब्ध साहित्याची नोंद, वापर आणि पुनर्भरण यांचे नियोजन कसे करावे हे स्पष्ट केले.

**सुरक्षा आणि देखभाल**: आगारातील सामग्री सुरक्षित ठेवणे, नुकसान टाळणे आणि नियमित तपासणीचे महत्त्व सांगितले.

**नोंदवही व कागदपत्रे**: आगाराशी संबंधित नोंदी, रजिस्टर व अहवाल लेखन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

**व्यवस्थापन कौशल्ये**: वनरक्षक म्हणून कार्य करताना शिस्त, जबाबदारी आणि कार्यक्षम व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले.

या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींना आगार व्यवस्थापनाबाबत प्रत्यक्ष कामात उपयोगी पाडणारे ज्ञान व कौशल्ये मिळाली, ज्यामुळे त्यांच्या भविष्यातील सेवेत कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा परतवाडा येथे क्षेत्रिय दौरा. ( दि. 13/03/2026 )**

**दि**. 13/03/2026 रोजी प्रशिक्षणार्थींना परतवाडा येथे आगार व्यवस्थापन आणि कूप कामे याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी नेण्यात आले. अशा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे जंगलातील लाकूड व्यवस्थापन, साठवण आणि नियोजनाची प्रत्यक्ष माहिती देणे.

**खालील प्रमाणे प्रशिक्षणार्थींना माहिती देण्यात आली**.

01. **आगार व्यवस्थापन** (Depot Management)

**लाकूड साठवण** (Timber Storage):- कापलेले लाकूड योग्य पध्दतीने कसे रचावे, त्याची वर्गवारी (Species, Size, Quality) कशी करावी.

**मोजमाप व नोंद** (Measurement & Records):- लाकडाचे घनफळ (Cubic Volume) कसे मोजायचे, मोजनी नोंदवही कशी भरायची.

**लिलाव प्रक्रिया** ( Auction Process) :- लाकूड विक्रीसाठी लिलाव कसा आयोजित केला जातो, त्याची प्रक्रिया.

**सुरक्षा उपाय** (Security):- आगारातील माल सुरक्षित ठेवण्यासाठी उपाययोजना, चोरी प्रतिबंध.

**दस्तऐवज व्यवस्थापन** (Documentation):- Transit Pass (TP), चालन, स्टॉक रजिस्टर इत्यादींचे महत्व.

02. **कूप कामे** ( Forest Coup Works )

**कूप म्हणजे काय**:- ठराविक क्षेत्रातील झाडांची शास्त्रीय पध्दतीने तोड करण्यासाठी विभागलेला भाग.

**मार्किंग** (Tree Marking):- कोणती झाडे तोडायची ते चिन्हांकित करण्याची पध्दत.

**तोडणी प्रक्रिया** (Felling):- सुरक्षित व नियोजनबध्द झाड तोडण्याच्या पध्दती.

**सफाई व वर्गीकरण**:- तोडलेल्या झाडांचे तुकडे करून त्यांची वर्गवारी.

**वाहतूक** (Transport):- जंगलातून आगारापर्यंत लाकूड कसे आणले जाते.

**पर्यावरण संरक्षण** :- झाडतोड करताना पर्यावरणीय नियमांचे पालन.

03. **प्रत्यक्ष प्रात्यक्षिक** (Field Demonstration)

- प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष आगारात नेऊन लाकूड मोजनी करून दाखवली.
- नोंदवही कशी भरायची हे शिकवले.
- कूप क्षेत्रात झाड मार्किंग व तोड प्रक्रिया दाखवली.

04. **नियम व कायदे** (Rules & Regulations )

- वन अधिनियम व संबंधित नियमांची माहिती.
- बेकायदेशीर तोड व वाहतूक रोखण्यासाठी उपाय.

05. **प्रश्नोत्तर सत्र** :

प्रशिक्षणार्थींनी विचारलेल्या शंका दूर करण्यात आल्या. प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यात आली.

ही संपूर्ण भेट प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी खूप महत्वाची असते, कारण यामुळे त्यांना भविण्यातील वनरक्षक म्हणून जबाबदाऱ्या समजायला मदत होते.

**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा परतवाडा येथे क्षेत्रिय दौरा. ( दि. 13/03/2026 )**






वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थीचा दि. 13/03/2026 रोजी आगार व्यवस्थापन व कुप कामांची माहिती करीता परतवाडा येथे क्षेत्रिय दौरा **श्री. एस.एस. बिजागरे, लेखापाल (से.नि.)** यांच्या मार्फत नेन्यात आला.

**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा कुप कामे पाहणी (जारीदा ) येथे क्षेत्रिय दौरा.**
**( दि. 14/03/2026 )**

**दि.** 14/03/2026 रोजी प्रशिक्षणार्थींना जारीदा परीक्षेत्रातील खारी कूप येथे कूप कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी नेण्यात आले होते. या भेटीचा मुख्य उद्देश प्रशिक्षणार्थींना जंगलातील कूप क्षेत्रात चालणाऱ्या कामांची प्रत्यक्ष माहिती व निरीक्षणाचा अनुभव देणे हा होता.

सदर ठिकाणी प्रशिक्षणार्थींना कूप क्षेत्राची पाहणी करून खालील बाबींविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**कूप क्षेत्राची रचना व सीमांकन**:- कूपाची हद्द, त्याचे विभागीकरण व नकाशानुसार क्षेत्र ओळखण्याची पध्दत प्रत्यक्ष दाखवण्यात आली.

**मार्किंग केलेल्या झाडांची पाहणी**:- आधीच चिन्हांकित (marked) केलेल्या झाडांची ओळख करून देण्यात आली व कोणत्या निकषांवर झाडांची निवड केली जाते हे स्पष्ट करण्यात आले.

**तोडणी झालेल्या भागाचे निरीक्षण**:- ज्या ठिकाणी झाडतोड पूर्ण झाली आहे, त्या भागाची पाहणी करून योग्य व अयोग्य पध्दतीतील फरक समजावून सांगण्यात आला.

**लाकूड रचनेची (Stacking) पाहणी**:- कूप क्षेत्रातच तात्पुरत्या स्वरुपात लाकूड कसे रचले जाते व त्याची मांडणी कशी असते हे दाखवण्यात आले.

**नैसर्गिक पुनर्जनन** (Regeneration):- झाडतोडीनंतर त्या भागात नवीन झाडांची वाढ कशी होते, तसेच पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात याची माहिती देण्यात आली.

**कामाच्या अंमलबजावणीची तपासणी**:- कूपात चालणारी कामे नियोजनानुसार होत आहेत का, याची पाहणी कशी करावी याचे मार्गदर्शन करण्यात आले.

**सुरक्षा व शिस्त**:- कूप क्षेत्रात काम करताना घ्यावयाची काळजी, अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाय व कामातील शिस्त यावर भर देण्यात आला.

या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष क्षेत्रात फिरुन निरीक्षण केले व अधिकाऱ्यांकडून आवश्यक माहिती घेतली. त्यांना कूप कामांची प्रत्यक्ष स्थिती समजून घेण्याची संधी मिळाली. जारीदा परिक्षेत्रातील खारी कूप येथे झालेल्या या पाहणीमुळे प्रशिक्षणार्थींना कूप कामांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून सखोल ज्ञान मिळाले. ही माहिती त्यांच्या भविष्यातील वनरक्षक म्हणून काम करताना अत्यंत उपयुक्त ठरेल.

**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांचा कुप कामे पाहणी (जारीदा ) येथे क्षेत्रिय दौरा**. ( **दि**. 14/03/2026 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचा **दि. 14/03/2026** रोजी **कुप कामे पाहणी** करीता **जारीदा परीक्षेत्र-खारी कुप** येथे क्षेत्रिय दौरा **श्री. एस.एस. बिजागरे, लेखापाल (से.नि.)** यांच्या मार्फत नेन्यात आला.

## 02. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची कोकण दौरा परीक्षा. ( दि. 05/03/2026 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा प्रशिक्षणादरम्यान कोकण शैक्षणीक अभ्यास दौरा (दि. 20/02/2026 ते 02/03/2026) नियोजित कार्यक्रमानुसार आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौऱ्याचा उद्देश प्रशिक्षणार्थींना कोकण विभागातील वनव्यवस्थापन, जैवविविधता, वनसंरक्षण, वन्यजीव व्यवस्थापन तसेच संबंधित प्रशासकीय कार्यपध्दतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळवून देणे हा होता.

सदर अभ्यास दौऱ्याच्या अनुषंगाने प्रशिक्षणार्थींची कोकण अभ्यास दौरा परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेद्वारे प्रशिक्षणार्थींचे अभ्यास दौऱ्यातील निरीक्षण, समज, प्राप्त ज्ञान तसेच त्याचा व्यावहारिक उपयोग करण्याची क्षमता यांचे मूल्यमापन करण्यात आले. परीक्षा ठरविण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार व नियमानुसार घेण्यात आली असून, सर्व प्रशिक्षणार्थींनी परीक्षेत सहभाग घेतला.

ही परीक्षा प्रशिक्षण प्रक्रियेचा एक महत्वाचा भाग असून, प्रशिक्षणार्थींच्या एकूण प्रगतीचे व क्षेत्रीय ज्ञानाचे मूल्यमापन करण्यासाठी उपयुक्त ठरली आहे. सदर परीक्षा ही **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे व नियोजनबध्द पध्दतीने पार पडली.

03. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र**. 63 **यांना** RRT/RRU **या विषयावर प्रशिक्षण**. ( **दि**. 06/03/2026 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींना **श्री**. **अमोल गानवेर**, **वनपाल**, **अमरावती वनविभाग** यांनी **RRT/RRU** (Rapid Response Team / Rapid Response Unit ) या विषयावर प्रशिक्षण दिले.

**या प्रशिक्षणात पुढील मुद्यांवर विशेष भर देण्यात आला**:

**RRT ( Rapid Response Team )**:- वन क्षेत्रात उद्भवणाऱ्या आपातकालीन परिस्थितींमध्ये - जसे की वनाग्नी, वन्यप्राणी-मानव संघर्ष, बेकायदेशीर वृक्षतोड-तात्काळ प्रतिसाद देणाऱ्या पथकाची भूमिका स्पष्ट करण्यात आली.

**RRU ( Rapid Response Unit)**:- अधिक संघटित व संसाधनसंपन्न युनिट म्हणून **RRU** कसे कार्य करते, त्याची रचना, उपकरणे आणि कार्यपध्दती यांची माहिती देण्यात आली.

**त्वरित प्रतिसादाचे महत्व**:

आपत्तीच्या सुरुवातीच्या टप्प्यात जलद कारवाई केल्यास नुकसान मोठ्या प्रमाणात टाळता येते, यावर भर देण्यात आला.

**समन्वय आणि कार्यपध्दती**:

वन विभाग, स्थानिक प्रशासन आणि इतर यंत्रणांबरोबर समन्वय साधून कार्य करण्याचे महत्व सांगण्यात आले.

**सुरक्षा व प्रशिक्षण**:

अशा पथकातील सदस्यांनी स्वत:ची सुरक्षा राखत प्रभावीपणे काम कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या सत्रामुळे प्रशिक्षणार्थींना आपत्कालीन परिस्थितीत त्वरित, समन्वयाने आणि प्रभावीपणे काम करण्याचे महत्व व पध्दती समजल्या.

**04. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना आस्थापना विषयक माहिती. ( दि. 07/03/2026 )**




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींना **श्री. ओमप्रकाश जाधव, लेखाधिकारी, अमरावती** यांनी  वनरक्षक संवर्गाशी निगडीत **आस्थापना** या विषयावर प्रशिक्षण दिले.

**या सत्रामध्ये पुढील महत्वाच्या बाबी स्पष्ट करण्यात आल्या**:

**आस्थापना म्हणजे काय**:- शासकीय कार्यालयातील कर्मचारी व्यवस्थापन, पदांची रचना, नियुक्त्या, बदली, पदोन्नती आणि सेवा नोंदी यांचा समावेश आस्थापना कार्यात होतो.

**कर्मचारी नोंद व सेवा पुस्तिका** (Service Book):- प्रत्येक कर्मचाऱ्याची सेवा पुस्तिका, वैयक्तिक नोंदी आणि त्यांचे अद्ययावत व्यवस्थापन कसे करावे याबाबत माहीती देण्यात आली.

**नियुक्ती व बदली प्रक्रिया**:- नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती, पदस्थापना, तसेच बदलीची प्रक्रिया आणि त्यासंबंधित नियम समजावून सांगितले.

**रजा व वेतन व्यवस्थापन**:- विविध प्रकारच्या रजा, त्यांचे नियम, वेतननिर्धारण आणि भत्ते याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**शिस्त व प्रशासकीय नियम**:- शासकीय सेवेत शिस्त, आचारसंहिता आणि नियमांचे पालन यांचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींना आस्थापना विषयक मूलभूत प्रशासकीय कामकाज समजले, जे त्यांच्या पुढील सेवेत अत्यंत उपयुक्त ठरेल.

## 05. **नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांचा** Power Point Presentation **सादरीकरण.** ( **दि.** 09/03/2026 )





वन प्रशिक्षण संस्थेत चालू असलेल्या सत्र क्र. 63 च्या नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांच्या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात प्रथम सत्र परीक्षा तसेच दुसऱ्या टप्प्यात द्वितीय सत्र परीक्षा घेण्यात आल्या. या दोन्ही परीक्षांनंतर प्रशिक्षणार्थींची मौखिक परीक्षा घेण्यात आली. वरील सर्व परीक्षांनंतर प्रशिक्षणार्थींकडून त्यांच्या प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या ज्ञानाचा आढावा घेण्यासाठी **Power Point Presentation** सादरीकरण आयोजित करण्यात आले.

सदर सादरीकरणादरम्यान प्रशिक्षणार्थींनी वनव्यवस्थापन, वनसंवर्धन, वनसंरक्षण तसेच शासकीय कर्तव्यपालन या संदर्भातील ज्ञान व कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले.

सदर **Power Point Presentation** सादरीकरण **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी घेतले. **संचालक,** यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणार्थींनी उत्कृष्ट सादरीकरण करुन प्रशिक्षणादरम्यान प्राप्त ज्ञान व कौशल्य प्रभावीपणे मांडले.

## 06. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांची मौखीक परीक्षा.** ( **दि.** 10/03/2026 )







वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थी यांची मौखीक परीक्षा दि. 10/03/2026 रोजी घेण्यात आली.

सर्वप्रथम, प्रशिक्षणार्थींची लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेत प्रशिक्षणार्थींना सैध्दांतिक ज्ञानाची चाचणी देण्यात आली. वनस्पती, प्राणी, वनसंपदा, कायदे आणि नियम या विषयांवरील माहितीवर विशेष भर देण्यात आला. लेखी परीक्षेतून प्रशिक्षणार्थींच्या विषयातील गहन समज आणि माहितीची पातळी तपासण्यात आली.

लेखी परीक्षे सोबत, प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष कामकाजात आपली क्षमता सिध्द करणे आवश्यक होते. जंगलातील पथदर्शक,

निरीक्षण, रेकॉर्ड ठेवणे, संरक्षणात्मक उपाय योजना इत्यादी कौशल्यांचे मूल्यमापन केले गेले. प्रात्यक्षिक परीक्षेचा उद्देश प्रशिक्षणार्थींच्या व्यावहारिक अनुभव आणि कौशल्याची पडताळणी करणे हा होता.



लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षांनंतर, प्रशिक्षणार्थींची **मौखीक परीक्षा** आयोजित केली गेली. या परीक्षेत प्रशिक्षणार्थींच्या ज्ञानाची, संवादकौशल्याची, आचारविचाराची आणि व्यावहारिक माहितीची तपासणी करण्यात आली. प्रशिक्षकांनी मौखीक परीक्षेतून त्यांच्या निर्णयक्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि एकूण प्रशिक्षणाची परिणामकारकता तपासली.

संपुर्ण सत्रात प्रशिक्षणार्थींच्या सर्वांगीण विकासावर भर दिला गेला. या प्रशिक्षणातून ते नवे ज्ञान आत्मसात करून वनरक्षक म्हणून कार्य करण्यास सक्षम झाले आहेत.

लेखी, प्रात्यक्षिक आणि मौखीक परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यामुळे सत्र क्र. 63 चे प्रशिक्षणार्थी पुढील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी सज्ज आहेत.

सदर मौखीक परीक्षा ही **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.

**07. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना सायबर सेल बाबत माहिती. ( दि. 12/03/2026 )**



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींना **श्री. दिनेश केंद्रे, सायबर सेल प्रतिनिधी, अमरावती** यांनी **सायबर सेल** या विषयावर प्रशिक्षण दिले.

**या सत्रामध्ये पुढील महत्वाच्या बाबींचा समावेश होता:**

**सायबर सेलची भूमिका** :- इंटरनेटद्वारे होणाऱ्या गुन्हांची तपासणी, प्रतिबंध आणि नियंत्रण यामध्ये सायबर सेलची महत्वाची भूमिका स्पष्ट करण्यात आली.

**सायबर गुन्ह्यांचे प्रकार** :- ऑनलाइन फसवणूक, हॅकिंग, सोशल मीडिया गैरवापर, ओटीपी फसवणूक, ओळख चोरी (Identity Theft ) इ. विविध सायबर गुन्ह्यांची माहिती देण्यात आली.

**सुरक्षा उपाययोजना** :- मजबूत पासवर्ड वापरणे, अनोळखी लिंक टाळणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे यांसारख्या मूलभूत सायबर सुरक्षेच्या उपाययोजना सांगण्यात आल्या.

**तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया** :- सायबर गुन्हा घडल्यास तक्रार कशी व कुठे नोंदवायची याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**वन विभागातील उपयोग** :- वन विभागातील कामकाजात डिजिटल साधनांचा वापर करताना सायबर सुरक्षेचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थ्यांना सायबर गुन्ह्यांविषयी जागरुकता निर्माण झाली व डिजिटल माध्यमांचा सुरक्षित वापर करण्याबाबत आवश्यक ज्ञान प्राप्त झाले.

## 08. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना आपत्ती व्यवस्थापन या विषयावर माहिती.**
## ( **दि.**09/03/2026 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींना **प्रा. सुधिर कोचाळे, एल.आर.टी. कॉलेज, अकोला** यांनी **आपत्ती व्यवस्थापन** या विषयावर प्रशिक्षण दिले.

**या सत्रामध्ये पुढील महत्वाच्या बाबींवर विशेष भर देण्यात आला**:

**आपत्ती व्यवस्थापनाची संकल्पना** :- नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचे स्परुप, त्यांचे परिणाम आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या पध्दती स्पष्ट करण्यात आल्या.

**आपत्तींचे प्रकार** :- पूर, भूकंप, वनाग्नी, भूस्खलन, दुष्काळ, जखमी व्यक्तीचे प्राथमीक उपचार इत्यादी विविध आपत्तींबाबत माहिती देण्यात आली.

**पूर्वतयारी** ( Preparedness ) :- आपत्ती येण्यापूर्वी घ्यावयाच्या खबरदारीच्या उपाययोजना आणि नियोजनाचे महत्त्व सांगण्यात आले.

**आपत्ती काळातील कृती** ( Response):- आपत्तीच्या वेळी त्वरित प्रतिसाद, बचावकार्य, नागरिकांचे संरक्षण आणि समन्वय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**आपत्तीनंतरची पुनर्बांधणी** (Recovery) :- आपत्ती नंतर पुनर्वसन, नुकसान भरपाई व परिस्थिती पूर्ववत करण्याच्या प्रक्रिया समजावून सांगितल्या.

**जखमी व्यक्तीला प्राथमिक उपचार व ड्रेसिंगची माहिती**:- जखमेची स्वच्छता कशी राखावी, अँटिसेप्टिकचा वापर कसा करावा तसेच योग्य पध्दतीने ड्रेसिंग व बँडेज कसे करावे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच रक्तस्त्राव थांबवणे, फ्रॅक्चरच्या वेळी घ्यायची काळजी आणि आवश्यक असल्यास रुग्णाला त्वरित वैद्यकीय मदत कशी मिळवून द्यावी याबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थ्यांना आपत्तीच्या विविध टप्प्यांमध्ये प्रभावीपणे काम करण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्ये प्राप्त झाली, जे त्यांच्या सेवेत अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

## 09. **यशवंतराव चव्हाण यांची जयंती** ( **दिनांक** 12/03/2026)




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 12/03/2026 रोजी **यशवंतराव चव्हाण** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

**यशवंतराव चव्हाण** यांची जयंती साजरी करणे म्हणजे त्यांच्या कार्याची आणि विचारांची आठवण ठेवण्याची महत्वपूर्ण संधी होय. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेले योगदान प्रेरणादायी आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि दूरदृष्टीमुळे राज्याला नवी दिशा मिळाली.

जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या आदर्शांचा पुनर्विचार करून समाजासाठी सकारात्मक कार्य करण्याची प्रेरणा मिळते. अशा कार्यक्रमांमुळे तरुण पिढीला इतिहासाची जाणीव होते आणि देशसेवेची भावना दृढ होते. त्यांच्या मूल्यांचा स्वीकार केल्यास समाज सक्षम आणि प्रगत होऊ शकते.

## 10. शहीद दिन ( दिनांक 23/03/2026 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 23/03/2026 रोजी **शहीद दिवस संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते मोठ्या आदराने व श्रध्देने साजरा करण्यात आला.

या दिवशी भगत सिंघ, राजगुरु, आणि सुखदेव थापर या महान क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण काढण्यात आली. विविध शासकीय कार्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये त्यांना अभिवादन करण्यात येते तसेच त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येते.

या निमित्ताने देशभक्तीची भावना दृढ करण्यासाठी आणि युवकांना राष्ट्रसेवेची प्रेरणा देण्यासाठी देशामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. शहीदांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय एकात्मता, कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प करण्यात आला. अशा प्रकारे शहीद दिवस साजरा करुन त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

## 11. **नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांची** 05 **कि.मी. धावण्याची स्पर्धा.**
## ( **दि.** 21/03/2026 )





वन प्रशिक्षण संस्थेत चालू असलेल्या सत्र क्र. 63 च्या नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थ्यांमध्ये 05 कि.मी. धाव स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे उद्दिष्ट प्रशिक्षणार्थींच्या शारीरिक क्षमता, सहनशक्ती आणि मानसिक तयारी यांचे मूल्यमापन करणे होते.

धाव स्पर्धेसाठी प्रशिक्षणार्थींना नियोजित मार्गावर धावण्यास सांगितले गेले. सर्व प्रशिक्षणार्थींनी उत्साहाने आणि पूर्ण प्रयत्न करून या धाव स्पर्धेत सहभाग घेतला. प्रशिक्षकांनी धाववेग, शिस्त, सहनशक्ती आणि प्रशिक्षणार्थींचा संघटनात्मक अनुभव यांचा बारकाईने अवलोकन केला.

धाव स्पर्धेच्या निकालांनुसार, प्रशिक्षणार्थ्यांचे शारीरिक तंदुरुस्तीचे स्तर तसेच मानसिक तयारीचा अंदाज घेता आला. ही स्पर्धा प्रशिक्षणार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाची ठरली आणि त्यांना भविष्यातील व्यावहारिक कार्यासाठी सज्ज करण्यास मदत झाली. सदर धाव स्पर्धा ही **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री. आर.जी.मून, वनपरिक्षेत्र अधिकारी, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री.एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली.

## 12. **नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना कराटे प्रशिक्षण .**
## **( दि. 16/03/2026 ते 25/03/2026 )**







वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींना **प्रा. डॉ. आनंद भुसारी, मुख्य प्रशिक्षक** व त्यांचा **चमू** यांनी **कराटे** प्रशिक्षण दिले.

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे आयोजित नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 63 यांचे सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना विविध विषयांचे सैध्दांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात प्रशिक्षणार्थींच्या शारीरिक क्षमता, आत्मसंरक्षण कौशल्ये व शिस्तबध्दता वृध्दिंगत करण्याच्या उद्देशाने कराटे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. कराटे प्रशिक्षणासाठी बाह्य तज्ज्ञ व्याख्याते यांची नियुक्ती करण्यात आली होती. संबंधित व्याख्यात्यांनी प्रशिक्षणार्थींना कराटेच्या मूलभूत तंत्रांचा परिचय करून दिला तसेच विविध आत्मसंरक्षण तंत्रे, शारीरिक तंदुरुस्ती राखण्याचे उपाय व आपत्कालीन परिस्थितीत स्वत:चे संरक्षण कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थींच्या आत्मविश्वासात वाढ झाली असून त्यांच्या शारीरिक क्षमतेत व शिस्तीत लक्षणीय सुधारणा झाल्याचे निदर्शनास आले आहे.

## 13. **नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांच्या क्रीडा स्पर्धा**.
## ( **दि**. 16/03/2026 **ते** 18/03/2026 )








वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे आयोजित नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 63 यांचे सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षणाच्या समारोपाच्या अनुषंगाने प्रशिक्षणार्थींसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा उपक्रमांचा उद्देश प्रशिक्षणार्थींच्या शारीरिक तुदुरुस्तीचा विकास करणे, संघभावना वृध्दिंगत करणे तसेच स्पर्धात्मक वृत्तीला चालना देणे हा होता.

या अंतर्गत बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, चेस, व्हॉलीबॉल, बॉस्केट बॉल, क्रिकेट इ. सामूहिक व वैयक्तिक खेळांचा समावेश करण्यात आला होता. प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून खेळांमध्ये उत्तम कामगिरी केली.

सदर क्रीडा स्पर्धांमुळे प्रशिक्षणार्थींच्या शारीरिक क्षमतेत वाढ झाली असून त्यांच्यात सहकार्याची भावना, शिस्त व नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत झाली आहे.

14. **नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.** 63 **यांचा सांस्कृतीक कार्यक्रम.** (दि.20/03/26)









वन प्रशिक्षण संस्थेत चालू असलेल्या सत्र क्र. 63 च्या नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असुन या कार्यक्रमास **संचालक,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच श्री.एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा हे सुध्दा या कार्यक्रमात उपस्थित होते.

## 15. **नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम**.








वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नव नियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी **क्र.** 63 कालावधी **दिनांक** 01/10/2025 **ते** 29/03/2026 यांनी आपले सहा महिने पायाभूत कालावधी प्रशिक्षण पूर्ण केले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण व दिक्षांत समारंभ कार्यक्रम **दि.** 28/03/2026 **रोजी** घेण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे **अध्यक्ष मा.श्रीमती निता कट्टे (भा.व.से )** उपवनसंरक्षक, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा व कार्यक्रमाचे **विशेष उपस्थिती** म्हणुन उपस्थित असलेले अतीथी **मा.श्री. अनंता डिगोळे** (म.व.से) विभागीय वन अधिकारी, मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा व तसेच सदर कार्यक्रमाचे **विनीत** म्हणुन उपस्थित **कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** (म.व.से) संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व तसेच या कार्यक्रमाला उपस्थीत कु. मनीषा आर. मगर्दे, सत्र संचालक (01), वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व कु. प्राची उराडे, सत्र संचालक (02), वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री. एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. व श्री. आर. जी. मून, वनपरिक्षेत्र अधिकारी, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री. पी.पी. चौधरी, वनपाल, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्रीमती. एस.डी. घाटे, ग्रंथालय मदतनीस, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थित सदर कार्यक्रम हा पार पडला.

वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.





# वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.










## वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.







# वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.








**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा दीक्षांत समारंभ कार्यक्रम.**



वनसंपदेचं रक्षण, पर्यावरणाचं संवर्धन आणि निसर्गाची सुरक्षा करण्याची शपथ घेऊन आज वनसेवेच्या नव्या पिढीने वन प्रशिक्षण संस्थेत दीक्षांत सोहळ्यातून वनसेवेच्या नव्या प्रवासाची सुरुवात केली. वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक सत्र क्र. 63 यांचा पासिंग आऊट सोहळा अत्यंत थाटात पार पडला.

नवे वनसैनिक निसर्गरक्षणसाठी सज्ज झाले असून, त्यांच्या शिस्तबध्द पावलांनी परेड मैदान परिसर दुमदुमला. **मा.श्रीमती निता कट्टे (भा.व.से** ) उपवनसंरक्षक, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला.

## 16. वृत्तपत्र कात्रणे.

# वन प्रशिक्षण संस्थेचा दिक्षांत समारंभ उत्साहात

## वनरक्षकांच्या ६३व्या मूलभूत प्रशिक्षण सत्राची यशस्वी सांगता



चिखलदरा दि.३० : वन प्रशिक्षण संस्थेच्या हरियाल सभागृहात वनरक्षकांच्या मूलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाच्या ६३व्या सत्राचा दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपवनसंरक्षक नीता कट्टे, वन्यजीव विभाग, परतवाडा होत्या.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मेळघाट वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी अनंता डिगोळे, चिखलदरा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शेख अब्दुल तसेच वन प्रशिक्षण संस्थेच्या संचालिका मुक्ताबाई टेकाळे व्यासपीठावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

समारंभाच्या प्रारंभी प्रशिक्षणार्थ्यांची पासिंग आऊट परेड झाली. परेडचे निरीक्षण उपवनसंरक्षक नीता कट्टे यांनी स्वीकारले. यानंतर प्रशिक्षणार्थ्यांनी योग, कराटे तसेच विविध मैदानी कवायतींचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. संचालिका मुक्ताबाई टेकाळे यांनी प्रशिक्षण सत्राचा आढावा सादर करताना सांगितले की, राज्यातील धुळे, अलिबाग, सावंतवाडी, नाशिक, नंदुरबार, सातारा व कोल्हापूर वन विभागांतील एकूण ४७ प्रशिक्षणार्थींनी सहा महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले असून सर्वजण यशस्वी ठरले. यापैकी २६ प्रशिक्षणार्थींनी प्राविण्य श्रेणी मिळवली.

विषयानुसार सर्वोच्च गुण मिळवणाऱ्यांमध्ये करुणा पाडकी, श्रेयश राय, बाबुराव आढळ, संतोष पाटील व साहिल थोरात यांचा समावेश आहे. क्रीडा प्रकारातही प्रशिक्षणार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. पाच किमी धावण्याच्या पुरुष गटात सचिन चौरे प्रथम, अभिजीत कारले व साजन पवार यांनी अनुक्रमे पुढील क्रमांक मिळवले; तर महिला गटात विजया वसावे, प्रियंका पावरा व अश्विनी पावरा यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच बॅडमिंटन, टेनिस, क्रिकेट, कॅरम, बुद्धिबळ, व्हॉलीबॉल व बास्केटबॉल या खेळांमध्येही प्रशिक्षणार्थ्यांनी कौशल्य दाखवत प्रमाणपत्रे प्राप्त केली.

प्रमुख पाहुणे अनंता डिगोळे यांनी विजेत्या प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील सेवेसाठी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात नीता कट्टे यांनी यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन करताना जंगल व निसर्ग संरक्षणाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचे आवाहन केले. सहा महिन्यांचे प्रशिक्षण हे त्यांच्या सेवाजिवनातील महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे संचालन पल्लवी यांनी केले, तर कवायत प्रशिक्षक सुधीर आखेवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुरुषोत्तम शर्मा सोळंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

**पुण्य नगरी**

# कराटे प्रशिक्षणातून ४७ वनरक्षक झाले सज्ज

▌दहा दिवसीय विशेष शिबिर उत्साहात

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**पांढरकवडा** : येथील यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशनच्या तज्ज्ञ व अनुभवी कराटे प्रशिक्षकांनी चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रशिक्षणार्थी वनरक्षकांसाठी विशेष कराटे आणि आत्मसंरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. वन प्रशिक्षण संस्थेत ४७ अप्रशिक्षित वनरक्षकांना दिलेले आत्मसंरक्षणाचे विशेष प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाले. २८ मार्च रोजी पार पडलेल्या दिमाखदार दीक्षान्त समारंभाने या प्रशिक्षण सत्राची अधिकृत सांगता झाली.

चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेत १ ऑक्टोबर २०२५ पासून 'पायाभूत प्रशिक्षण सत्र क्रमांक ६३' राबविण्यात येत होते. या सत्राचा महत्त्वाचा भाग म्हणून १६ ते २६ मार्चदरम्यान दहा दिवसांच्या कालावधीत वनरक्षकांसाठी विशेष कराटे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी या प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध कराटे प्रशिक्षक डॉ. आनंद भुसारी, योगेश पडोळे आणि हितेश नागभीडकर यांनी वनरक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांनी वनरक्षकांना मोलाचे मार्गदर्शन केले. जंगलात कर्तव्यावर असताना हिंस्त्र श्वापदे किंवा समाजकंटकांशी सामना करावा लागतो. अशा वेळी स्वतःचा बचाव कसा करावा, याचे शास्त्रोक्त धडे या ४७ वनरक्षकांना देण्यात आले. १० दिवसांच्या या सत्रात शारीरिक चपळता आणि मानसिक कणखरता वाढविण्यावर भर देण्यात आला. २८ मार्च रोजी सकाळी ८ वाजता वन प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर 'पासिंग आऊट परेड' व दीक्षान्त समारंभ पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी सिपना वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षक नीता कट्टे, मेळघाट वन्यजीव विभागाचे विभागीय वनअधिकारी अनंता डिगोळे यांची उपस्थिती होती. संस्थेच्या संचालक मुक्ता टेकाळे यांच्या मार्गदर्शनात हे संपूर्ण प्रशिक्षण सत्र यशस्वीरीत्या पूर्ण झाले. दुर्गम भागात काम करणाऱ्या वनरक्षकांसाठी हे कराटे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी यशस्वी प्रशिक्षणार्थींचा गौरव करण्यात आला.

**पहिलेच अभिनव प्रशिक्षण**

वनविभागाच्या इतिहासात चिखलदरा येथील प्रशिक्षण केंद्रात वनरक्षकांसाठी अशा प्रकारचे 'कराटे प्रशिक्षण' पहिल्यांदाच आयोजित करण्यात आले होते. जंगलात गस्त घालताना हिंस्त्र श्वापदे किंवा लाकूड तस्कर व शिकारी लोकांशी सामना करताना विना शस्त्र स्वतःचा बचाव कसा करावा, याचे शास्त्रोक्त धडे या प्रशिक्षणातून देण्यात आले.

Yavatmal Edition
Mar 30, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

---

# कराटे प्रशिक्षणातून ४७ वनरक्षक झाले 'सज्ज



**पांढकवडा**

•दै. सिंहझेप

येथील यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशनच्या तज्ज्ञ व अनुभवी कराटे प्रशिक्षकांनी चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रशिक्षणार्थी वनरक्षकांसाठी विशेष कराटे आणि आत्मसंरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. वन प्रशिक्षण संस्थेत ४७ अप्रशिक्षित वनरक्षकांना दिलेले आत्मसंरक्षणाचे विशेष प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाले. दि. २८ मार्च रोजी पार पडलेल्या दिमाखदार दीक्षांत समारंभाने या प्रशिक्षण सत्राची अधिकृत सांगता झाली. चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेत १ ऑक्टोबर २०२५ पासून 'पायाभूत प्रशिक्षण सत्र क्रमांक ६३' राबविण्यात येत होते. या सत्राचा महत्त्वाचा भाग म्हणून १६ मार्च ते २६ मार्च २०२६ या १० दिवसांच्या कालावधीत वनरक्षकांसाठी विशेष कराटे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी कराटे या विषयात महाराष्ट्रातील पहिली पीएचडी (PhD) प्राप्त करणारे प्रसिद्ध कराटे प्रशिक्षक डॉ. आनंद भुसारी, ब्लॅक बेल्ट योगेश पडोळे आणि हितेश नागभीडकर यांनी वनरक्षकांना मार्गदर्शन केले. यांनी वनरक्षकांना मोलाचे मार्गदर्शन केले.

जंगलात कर्तव्यावर असताना हिंस्त्र श्वापदे किंवा समाजकंटकांशी सामना करावा लागतो. अशा वेळी स्वतःचा बचाव कसा करावा, याचे शास्त्रोक्त धडे या ४७ वनरक्षकांना देण्यात आले. १० दिवसांच्या या सत्रात शारीरिक चपळता आणि मानसिक कणखरता वाढविण्यावर भर देण्यात आला. यवतमाळ जिल्ह्यातील प्रशिक्षकांनी दिलेल्या या दर्जेदार निपुणतेमुळे वनरक्षकांचे मनोबल उंचावले आहे.

शनिवार, २८ मार्च रोजी सकाळी ८.०० वाजता वन प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर 'पासिंग आऊट परेड' व दीक्षांत समारंभ पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सिपना वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षक नीता कट्टे (IFS) उपस्थित होत्या. तसेच मेळघाट वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी अनंता डिगोळे यांची विशेष उपस्थिती लाभली.

संस्थेच्या संचालक मुक्ताबाई टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे संपूर्ण प्रशिक्षण सत्र यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

---

**तरुण भारत**

Paschim Vidarbha | 2026-03-30 | Page- 9
epaper.tarunbharat.net

# कराटे प्रशिक्षणातून ४७ वनरक्षक झाले सज्ज

### १० दिवसांचे विशेष शिबिर उत्साहात

◆ **पांढरकवडा, २९ मार्च**

यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशनच्या तज्ज्ञ व अनुभवी कराटे प्रशिक्षकांकडून चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रशिक्षणार्थी वनरक्षकांसाठी विशेष कराटे व आत्मरक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

वन प्रशिक्षण संस्थेत ४७ अप्रशिक्षित वनरक्षकांना दिलेले आत्मरक्षणाचे विशेष प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण झाले. शनिवारी पार पडलेल्या दीक्षांत समारंभाने या प्रशिक्ष सत्राची अधिकृत सांगता झाली.

चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्थेत १ ऑक्टोबर २०२५ पासून 'पायाभूत प्रशिक्षण सत्र क्रमांक ६३' राबविण्यात येत होते. या सत्राचा महत्त्वाचा भाग म्हणून १६ ते २६ मार्च या १० दिवसांच्या कालावधीत वनरक्षकांसाठी विशेष कराटे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी यवतमाळचे प्रसिद्ध कराटे प्रशिक्षक डॉ. आनंद भुसारी, योगेश पडोळे व हितेश नागभीडकर यांनी वनरक्षकांना मोलाचे मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील प्रशिक्षकांनी दिलेल्या या दर्जेदार निपुणतेमुळे वनरक्षकांचे मनोबल उंचावले आहे. ◂*(तभा वृत्तसेवा)*

**पहिलेच अभिनव प्रशिक्षण**

वनविभागाच्या इतिहासात चिखलदरा येथील प्रशिक्षण केंद्रात वनरक्षकांसाठी अशा प्रकारचे कराटे प्रशिक्षण पहिल्यांदाच आयोजित करण्यात आले होते. जंगलात गस्त घालताना हिंस्र श्वापदे किंवा लाकूड तस्कर व शिकारी लोकांशी सामना करताना विनाशस्त्र स्वतःचा बचाव कसा करावा, याचे धडे या प्रशिक्षणातून देण्यात आले. ■

Powered by Bharati Web